**-: प्रेस नोट :-                दिनांक ०२/०९/२०२३**

**‘‘ मुलुंड पोलीस ठाणे अभिलेखावरील हस्तगत ८० मोबाईल फोन त्यांचे मूळ वापरकर्त्यांना परत केलेबाबत ’’**

मुलुंड पोलीस ठाणे हद्दीत चोरीस गेलेले/हरविलेले मोबाईल फोनचा शोध घेणेकामी मुलुंड पोलीस ठाणेकडून शोध मोहिम राबविण्यात आली होती. या पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मानवी कौशल्य व गोपनीय बातमीदार यांचा वापर करून एकूण ८० मोबाईल फोन (एकूण किंमत रुपये १६,५८,९००/-) हस्तगत केले.

आज  दिनांक ०२/०९/२०२३ रोजी श्री. पुरुषोत्तम कराड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ०७, मुंबई, श्री. रविंद्र दळवी, सहाय्यक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग, मुंबई, श्री.कांतीलाल कोथिंबीरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुलुंड पोलीस ठाणे यांचे उपस्थितीत सदर हस्तगत करण्यात आलेले ८० मोबाईल फोन मूळ वापरकर्त्यांना परत करण्यात आले. यावेळी नागरीकांनी हरविलेले मोबाईल परत मिळालेबद्दल आनंद व्यक्त केला.

सदरची कामगिरी मा.श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. सत्यनारायण चौधरी, पोलीस सह आयुक्त(का व सु) बृहन्मुंबई, मा.श्री. विनायक देशमुख, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबुर, मा.श्री. पुरुषोत्तम कराड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०७, मुंबई, श्री. रविंद्र दळवी, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कांतीलाल कोथिंबीरे, पोउनि अमोल बोरसे, पो.शि. १११५४२/राहुल पवार, पो.शि.१११५६७/अनिल पवार, मपोशि ०९१२१४/हाडवळे  या पथकाने केली आहे.

.........................